Vol 4 Issue 10 Nov 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-10 | Nov-2014
Available online at www.isrj.org

# *जिल्हा परिषद शाळांमध्ये विविध स्तरांवरून राबिवण्यात येणाऱ्या योजना*

***लक्ष्मण पोपट नरसाळे***

मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेमळा (वडगाव सावताळ),
ता.पारनेर, जि.अहमदनगर (महाराष्ट्र)

***सारांश–*** आजचा विद्यार्थी हा भविष्यातील समाजाचा प्रमुख घटक आहे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक, मानसिक व सामाजिक विकास होणे गरजेचे आहे. त्याला सक्षमपणे घडविण्याची जबाबदारी ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळांवर आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सध्याच्या स्पर्धेच्या युगात सक्षमपणे टिकाव्यात म्हणून केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा परिषदा विविध योजना आणि उपक्रम राबवत आहेत. पण या योजना किती असाव्यात आणि खरच याची आवश्यकता किती आह? अनावश्यक बोजा शिक्षकांवर टाकून, कागदी घोडे नाचवून आपण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंद पाडण्याच्या दिशेने तर चाललो नाहीत ना? ''घरचे झाले थोडे अन व्याह्याने धाडले घोडे'', अशी अवस्था शिक्षकांची झाली आहे. या बाबीचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे.

***प्रस्तावना–***

शालेय शिक्षण हा संपूर्ण शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे. प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे, कुटुंब, गाव व राष्ट्रीय विकासाचे तसेच समाज परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. म्हणून प्राथमिक शिक्षण सुविधा सर्व बालकांपर्यंत पोहचविण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा परिषदा विविध योजना आणि उपक्रम राबवत आहेत.

'' बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण मिळविण्याचा हक्क 2009'' हा कायदा अस्तित्त्वात आला. या कायद्याने बालकास 6 ते 14 वयोगटापर्यंत मोफत शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. तर प्राथमिक सुविधा पुरविणे, अध्यापन सेवा पुरविणे, अध्ययन अध्यापन साधन सामुग्री उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निश्चित करणेत आली आहे. शाळेत दाखल करून घेऊन दर्जेदार शिक्षण देण्याचे कर्तव्य शासन व अध्यापन कर्त्यावर निश्चित करण्यात आले आहे.

शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने शिक्षकांमधील व्यावसायिक क्षमता वृध्दिंगत करून अध्ययन अध्यापन समृध्द होणे महत्त्वाचे ठरते. बदलत्या काळानुसार समाजाच्या गरजेनुसार अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत नवनवीन कौशल्ये, तंत्रे, पध्दती यांचा समावेश होणे आवश्यक आहे. तरच अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी, विद्यार्थीकेंद्रित, कृतीप्रधान, प्रेरणादायी ठरू शकेल. मग प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार स्वरूपाचे मोफत प्राथमिक शिक्षण मिळेल.

विविध योजना, उपक्रम व असंख्य शाळाबाह्य कामे यांची सध्या एवढी रेलचेल झालीय की प्रत्यक्ष अध्यापन व शैक्षणिक कामापासून शिक्षक दूर जाऊ लागला आहे. या सर्व बाबींचे कोणकोणते दूरगामी सामाजिक परिणाम एकूणच संपूर्ण समाजावर होणार आहेत याचा चिकित्सक अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### *जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना :*

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत इ.1 ली ते 7 वी च्या मुलांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येते. विद्यार्थ्याला दर्जेदार स्वरूपाचे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासन पुरस्कृत अशा पुढील योजना राबविल्या जातात.

### *अ) केंद्र शासन पुरस्कृत योजना :*

1) शाळा खोल्या बांधकाम
2) शाळाबाह्य मुलांसाठी पर्यायी शिक्षण केंद्रे
3) मोफत पाठ्यपुस्तके
4) विविध अनुदाने
5) शिक्षक प्रशिक्षण
6) संशोधन व मूल्यमापन
7) अध्ययन– अध्यापन साहित्य अनुदान
8) लोकप्रतिनिधी प्रशिक्षण
9) अपंग समावेशित शिक्षण
10) शाळाखोल्या मोठ्या दुरुस्त्या
11) मध्यान्ह भोजन योजना
12) मोफत गणवेश योजना
13) राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजना
14) शाळांना भौतिक सुविधा :

भौतिक सुविधांमध्ये मुख्याध्यापक कार्यालय, शिक्षकांच्या प्रमाणात वर्ग खोल्या, किचन शेड, क्रीडांगण सुविधा, मुला–मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, ग्रंथालय, रॅम्प सुविधा, मुबलक शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य, वीज, या बाबींचा समावेश होतो.

### *ब) राज्य शासन पुरस्कृत योजना :*

1) दुर्बल घटकातील इ.1 ली ते 4 थी च्या मुलींना उपस्थितीभत्ता
2) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील सर्व मुला–मुलींना मोफत पाठ्यपुस्तके पुरविणे.
3) शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिक योजना.
4) ग्रामीण भभागात आदर्श शाळा पुरस्कार .
5) सर्व मुली, दा.रे.खालील मुले, अनु. जमातीतील मुले यांना मोफत गणवेश.
6) इ.1 ली ते 7 वी च्या मुलांना अभ्यासपुरक पुस्तके, इंग्रजी कोष पुरवणे.
7) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना.
8) शालेय आरोग्य तपासणी
9) मध्यान्ह भोजन योजना
10) शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या भागातील मुलांना मोफत लेखन साहित्य.

### *सर्व शिक्षा अभियान :*

भभारतातील 6 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणारी एक बहुव्याप्त योजना केंद्र शासनाने मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत उचललेले अभिनव पाऊल म्हणून सर्व शिक्षा अभियानाकडे पाहता येईल. या उपकमाचा इ. स. 2009 मध्ये प्रारंभ झाला, तेव्हा त्याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती :

1) सर्व 6 ते 14 वर्षे वयोगटातील शाळेतील मुलामुलींना अध्यापनाची हमी देणे.

2) इ. स .2006 पूर्वी सर्व मुले मुली शाळेत, शिक्षण हमी केंद्रात, पर्यायी शाळेत अथवा शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.
3) इ. स. 2007 पूर्वी सर्व मुलामुलींना पाच वर्षांचे प्राथमिक शिक्षण देणे.
4) इ. स. 2010 पूर्वी सर्व मुलामुलींना आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण देणे.
5) समाधानकारक, दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठीच्या शिक्षणावर भर देणे.
6) इ. स. 2007 पूर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरांवरील उणिवा दूर करुन जातीनिरपेक्ष व मुलामुलींना समान शिक्षण देणे; तसेच लिंगभेद व समाजाच्या विविध घटकांतील दरी इ. स. 2010 पर्यंत भभरुन काढणे आणि इ. स. 2007 पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सर्वांना समान पातळी निर्माण करणे.
7) इ. स. 2010 पर्यंत सर्व मुले–मुली शाळा सोडणार नाहीत, याची दक्षता घेणे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत पर्यायी शिक्षणाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रातील पर्यायी शिक्षणाच्या योजना पुढीलप्रमाणे :

(1) वस्तीशाळा,
(2) महात्मा फुले प्राथमिक शिक्षण हमी योजना,
(3) महात्मा फुले उच्च माध्यमिक शिक्षण हमी योजना,
(4) राजीव गांधी संधी शाळा योजना,
(5) स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना,
(6) सेतुशाळा,
(7) उपचारात्मक वर्ग,
(8) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, इत्यादी.

***मध्यान्हभभोजन योजना –***

केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त उपक्रमातील एक महत्वाकांक्षी योजना म्हणून मध्यान्हभभोजन योजनेकडे पाहिले जात आहे. या योजनेचे यशापयश पाहत असताना या योजनेमुळे प्रत्यक्ष शालेय कामकाजामध्ये ग्रामीणभभागातील जिल्हा परिषद शाळांना किती समस्यांना तोंड द्यावे लागते हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यात विविध योजना व उपक्रम यांची गरज आहे. परंतु बऱ्याच वेळा प्रशासनाकडून "आग सोमेश्वरी , बंब रामेश्वरी " भूमिका घेऊन शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यावर अतिरिक्त बोजा टाकला जातो. बऱ्याचशा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली तर निश्चितपणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढेल.

***संदर्भः***

1) बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण मिळविण्याचा हक्क 2009'
2) राज्य व केंद्र शासनाच्या योजना– जि.प.अहमदनगर वेबसाईट
3) शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम, प्राचार्य डॉ. पी. एस. पवार समन्वयक, पुणे विद्यापीठ,विभागीय कार्यालय, नाशिक
4) प्राथमिक शिक्षणाच्या समस्या (1962), वासुदेव बळवंत कर्णिक ,पुणे – ठोकळ प्रकाशन
5) " रत्नागिरी जिल्ह्यातील पावस बिटातील शालेय पोषण आहार योजनेचा सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे" (2009) – गुरव राजेशकुमार भिकाजी.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org